रयत शिक्षण संस्थेचे,

# राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर.

(नॅक पुनर्मूल्यांकन – ब श्रेणी)

मराठी विभाग आयोजित

# 'राष्ट्रीय परिषद'

## 'आंतरविद्याशाखीय संशोधन : स्वरूप आणि संधी'

(दि. २२ व २३ डिसेंबर २०१५)

# PROCEEDING

ISBN 978-93-83401-34-5



रयत शिक्षण संस्थेचे,

# राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर.

नॅक मानांकित 'B' श्रेणी

# राष्ट्रीय चर्चासत्र

(दिनांक २२-२३ डिसेंबर २०१७)

## 'आंतरविद्याशाखीय संशोधन : स्वरूप व संधी'

ISBN : 978-93-83401-34-5

**आयोजक**

प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे

**संपादक मंडळ**

प्रा.डॉ. संजय नगरकर
समन्वयक (मराठी)

| | | | |
|---|---|---|---|
| प्रा. संभाजी कातोरे<br>सहसमन्वयक<br>(राज्यशास्त्र) | प्रा. गफूर शेख<br>सहसमन्वयक<br>(इतिहास) | प्रा. बुवासाहेब ढेरे<br>सहसमन्वयक<br>(शा. शिक्षण) | प्रा. मनोहर करांडे<br>सहसमन्वयक<br>(इंग्रजी) |
| प्रा. भूपेंद्र निकाळजे<br>सहसमन्वयक<br>(हिंदी) | प्रा.संतोष गायकवाड<br>सहसमन्वयक<br>(मानसशास्त्र) | प्रा.डॉ.वैशाली पाटील<br>सहसमन्वयक<br>(अर्थशास्त्र) | प्रा. सहदेव आव्हाड<br>सहसमन्वयक<br>(समाजशास्त्र) |
| प्रा. निखिल गोयल<br>सहसमन्वयक<br>(वाणिज्य) | प्रा. गणेश जाधव<br>सहसमन्वयक<br>(भूगोल) | प्रा. ज्ञानेश्वर शिंगाडे<br>सहसमन्वयक<br>(ग्रंथालयशास्त्र) | |

- प्रोसिडींग शीर्षक : 'आंतरविद्याशाखीय संशोधन : स्वरूप व संधी'

  (Interdiciplinary Research: Nature

  Opportunities)

- मालकी हक्क : राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर

  ४१४००१ (महाराष्ट्र)


  © सर्व हक्क सुरक्षित


- प्रकाशक : प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे

  राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर

  ४१४००१ (महाराष्ट्र)

- मुद्रक : गणेश प्रिंटर्स, केडगाव, अहमदनगर ४१४००१.

- प्रथम आवृत्ती : २२ डिसेंबर २०१५ (राष्ट्रीय परिषद)

- अक्षरजुळणी : होमकर अरविंद

- ISBN : 978-93-83401-34-5

- पृष्ठ संख्या : ३३२



या प्रोसिडींगमध्ये प्रसिध्द झालेल्या शोधनिबंधातील विचारांशी संपादक मंडळ, प्राचार्य, संस्था सहमत असतीलच असे नाही.

| अ.नं. | पेपरचे नाव | संशोधकाचे नाव | पान. नं. |
|---|---|---|---|
| ८७. | "Impact of Globalization on Growth of Small Scale Industries in India" | Prof. Gadhe D.P. | २९० ते २९२ |
| ८८. | संशोधन : स्वरुप आणि व्याप्ती | डॉ. तोडकर बी. डी. | २९३ ते २९६ |
| ८९. | "Library and Information Science Research" | Kangune G. M. & Aute G.P. | २९७ ते ३०४ |
| ९०. | Role Of Library In College Research Output: A Study | Mr. Salunke Nandkumar Laxman | ३०५ ते ३०९ |
| ९१. | Creating A Library Website By Using Google Sites: Pgmcoe Library Website | Mr. Shingade Baban Dattu<br>Mr. Bachute Shyam Rambhau | ३१० ते ३१६ |
| ९२. | संशोधन आणि संशोधनाचे प्रकार | प्रा.शिंगाडे डी.आय.,प्रा.चक्के एम.आर. | ३१७ ते ३१९ |
| ९३. | Importance Of Academic Libraries In Research | Asst. Prof. Takawane S M<br>Asst. Prof. Takawane C. S. | ३२० ते ३२२ |
| ९४. | संशोधन स्वरुप व शारीरिक शिक्षण पध्दती - एक चिंतन | प्रा.मेहेर प्रशांत रतिलाल | ३२३ ते ३२४ |
| ९५. | राजकीय सारीपाट : मराठी भाषा, कला व साहित्य | प्रा. काळे विनायक<br>प्रा. पवार बाबासाहेब | ३२५ ते ३२६ |
| ९६. | सामाजिक शास्त्रातील संशोधनाची रुपरेषा | प्रा. डॉ. शिंदे राजेंद्र | ३२७ ते ३२९ |
| ९७. | साहित्य समाज आणि संस्कृती यांचा अनुबंध | डॉ. चौधरी शांताराम बबनराव | ३३० ते ३३२ |

# संशोधन आणि संशोधनाचे प्रकार

सार:

*'संशोधनात साहित्याचे समालोचन अथवा संशोधनाचा पूर्वअभ्यास हा पाया मानला जातो. संशोधनाच्या पूर्वाभ्यासामुळे संशोधनाच्या दृष्टीने कोठे कोणती माहिती मिळेल याची सुप्त जाणिव संशोधकाला सबंधित विषयाने आपोआप निर्माण होते.'*

*संशोधन ही एक विषयनिरपेक्ष अशाी प्रवृत्ती असुन तीचे चिंतन, अवलोकन, तर्क, अनुभव, प्रयोग, परिक्षण, तपास इ. क्रियांशी घनिष्ठ संबंध येतो.*

*संशोधन हाती घेण्यापूर्वी तो विषय निवडणे त्यासंबंधी सविस्तर माहिती जाणून घेणे महत्वाचे असते. अनेक विषयावरचे काय वाचायचे हा मोठा प्रश्न निर्माण होतो. नव्या विषयावर संशोधन करण्यापूर्वी त्याबद्दलची कल्पना अतिशय संधिग्ध अस्पष्ट असते. शोधक्रियेचे अंतिम ध्येय म्हणजे प्रश्नाचे स्वरूप आकलन होणे व त्यांच्या सोडवणूकीचा मार्ग सुस्पष्ट होणे किंवा तात्विक अंगाने आकलन होणे हे संशोधन क्रियेत महत्वाचे मानले जाते.*

**प्रस्तावना:**

संशोधनामुळे नवीन ज्ञान निर्माण केले जाते. जुन्या ज्ञानाचा नवीन दृष्टीने विचार केला जातो. अर्थात ही नित्याची प्रक्रिया आहे. ही सतत घडत असते. विषयांतर्गत वैशिष्टये जाणून घेण्यासाठी केलेला व्यापक शोध म्हणजे संशोधन होय.

ज्ञान झपाटयाने वाढते आहे. अगदी थोडयाश्याच कालावधीत आजचे ज्ञान दुपटीने वाढल्याचे दिसते. विषय, संशोधक, अभ्यासक, आणि लेखक आपापला अभ्यास आणि लेखन कार्यातून ज्ञानात सातत्याने भर घालत असतात. प्रसिद्रध होण्या–या साहित्यात त्यामुळे प्रचंड भर पडताना दिसते. पुस्तके आणि नियतकालिके विकसीत अन विकसनशील देशातही सारख्याच प्रमाणात प्रसिद्रध होतात. आपला भारत देश दरवर्षी जवळजवळ विस हजारांहून अधिक पुस्तकांचे प्रकाशन करतो.

ज्या व्यक्तीला भूतकाळांविषयी पूर्ण ज्ञान नसेल तर अशा व्यक्तीला काही विषयात भर घालण्याची संधी फारच कमी असते. यासाठीच संशोधकाला स्वतःच्या अभ्यासविषयक क्षेत्रात जे जे म्हणून वाड.मय उपलब्ध असेल त्याचाशोध, आढावा घेणे, सर्वेक्षण करणे आवश्‍वक आहे. संशोधकाला नेहमीच आपल्या अभ्यासक्षेत्रासबंधी आणि अनुषंगिक विषयाबाबत अद्रयायावत माहिती ठेवावी लागते.

**संशोधन:**

'संशोधन म्हणजे समस्येचे तात्पुरते उत्तर मिळविण्याची एक तर्कशुदध प्रक्रिया आहे.' ज्ञानाचा शोध घेणे, त्याचा विकास करणे आणि ते तपासून बघणे, घटनांमधील संबंधाचा शोध घेणे, सर्व संशोधनात अंतर्भूत आहे.

वेबस्टर शब्दकोशाप्रमाणे 'संशोधन म्हणजे नवीन घटना शोधून काढताना त्यांचा अभ्यास, परीक्षा, टीकात्मक शोध, प्रयोगशिलता या गोष्टी अवलंबून असतात. त्या नवीन घटनांचे स्पष्टीकरण त्यातून उदभवलेले निर्णय, सिदधांत म्हणजे संशोधन.'

ज्ञान संपादन करण्याची एक पदधती म्हणजे तार्किक संशोधन. यामध्ये समस्या निवडली जाते. त्यातून गृहितकृत्य तयार केले जाते. नंतर तथ्यात्मक माहिती गोळा करून तिचे विश्‍लेषण करणे या क्रिया समाविष्ट असतात. यातून मिळणा–या माहितीच्या आधारावार गृहीतकृत्य प्रत्यक्षात येते. ते नंतर अनुभवजन्य मानले जाते. सर्व घटनांच्या बाबतीत हाच अनुभव आल्यास ते बौद्रिधक सिद्रधांत मानले जाते.

तथ्य हे वस्तुस्थिती दर्शक असते. ज्या निरिक्षणाचा मानवी संवेदनांशी अनुभव घेता येतो अशी माहिती म्हणजे तथ्य. तथ्यातील अंतर्गत संबंध म्हणजे सिद्रधांत होय. सिद्रधांत परिस्थितीजन्य असतो. अभ्यास विषयातील घटकांच्या परस्पर सबंधाविषयी जे निश्‍चित विधान केले जाते ते विधान म्हणजे सिद्रधांत. सिद्रधांत व तथ्य एकमेकांशी पूरक आहेत. सिद्रधांताची उपयोगिता तथ्यामुळे सिद्रध होते. तर तथ्यामुळे सिद्रधांताचा विकास होतो.

**संशोधनाचे प्रकार: संशोधनाचे पुढील चार प्रकार पडतात.**

**अ. मुलभूत संशोधन ब. उपयोजित संशोधन क. कृतिशील संशोधन ड. आंतरशाखीय संशोधन**

**अ. मुलभूत संशोधन:**

मुलभूत संशोधन घटनांच्या संबंधीत केले जाते. या प्रकारच्या संशोधनात ज्ञानाची प्राप्ती, वृद्रधी व जुन्या ज्ञानाचे परिक्षण या गोष्टी सामाविष्ट असतात. जुने सिद्रधांत वर्तमानकाळाशी सुसंगत आहेत का याची तपासनी होते. नवीन तथ्ये व घटना यांच्यातील सबंधाचा तपशील तपासला जातो. यामुळे नविन सिद्रधांत तयार होतात. कारण काळामध्ये बदल होत असतात. सत्याचा शोध घेणे हे या प्रकारचे मुख्य वैशिष्ये आहे.

**ब. उपयोजित संशोधन:**

या प्रकारचे संशोधन व्यावहारिक जिवनाशी संबंधित असते. यामध्ये व्यावाहारिक जीवनातील संबंधित विषय असतात. या विषयातील प्रश्नाबाबत यथार्थ ज्ञान मिळवणे हा या संशोधनाचा हेतू आहे. व्यावाहारिक ज्ञानाचा उपयोग विकासासाठी करता यावा यासाठी हे ज्ञान मिळविणे आवश्वक आहे. असा या संशोधनाचा विचार असतो. म्हणून याला व्यवहारोपयोगी संशोधन असे म्हणतात. हे संशोधन समाजाच्या विषयाशी सबंधित असते. यामध्ये सामाजिक नियोजन, शिक्षण धर्म वगैरे विषय अंतर्भूत असतात. यातूनच तर्कशुदध ज्ञान व त्यांचा परस्परसबंध शोधला जातो. व्यवहारिक उपयोगासाठी ज्ञानाचा उपयोग करणे ही गोष्ट महात्वाची असते. यामध्ये समस्यांची उकल त्याविषयी सुधारणा या गोष्टी समाविष्ट होत नाहीत.

**क. कृतिशील संशोधन:**

संशोधनातील निष्कर्ष भविष्य कालीन योजनांशी सबंधित असतात तेव्हा कृतिशिल संशोधन प्रत्यक्षात येते. हे संशोधन उपयोजित संशोधनाशी सबंधित आहे. यातिल निष्कर्ष हे परिवर्तन घडवून आणणा–या प्रकल्पाशी सबंधित असतात. विद्यमान स्थितीमध्ये बदल घडवून आणणे हा या संशोधनाचा उद्देश आहे. या प्रकारामध्ये लोकांचे सहकार्य आवश्यक असते. बदलाप्रमाणे अहवाल बदलावा लागतो. घटना आणि समस्या यांच्या वास्तविकतेवर भर असतो.

**ड. आंतरशाखीय संशोधन:**

यामध्ये नवीन ज्ञानशाखा, उपशाखांचा उदय झाला. यासाठी निरनिराळया ज्ञानशाखांतील तंत्राचा उपयोग होतो. समस्येची उकल केली जाते. ती दुर करण्यासाठी इतर शास्त्रांची मदत घेतली जाते. आंतरशाखीय माहीतीमुळे विशेषत: समाजशास्त्र, अर्थशास्त्र, मानसशास्त्र यामुळे समस्या निवारणास मदत होते.

माहितचे स्वरूप आंतरशाखीय असते. ज्ञानशाखा या एकमेकांशी सबंधित असतात. म्हणून नवीन आंतरशाखिय माहिती आकाराला येत आहे.

**संशोधन आराखडा:**

संशोधनाचा हेतू, विषय, उद्दिष्ट यांचा विचार झाल्यावर यासाठी कोणत्या गोष्टी कराव्या लागतील याचे पूर्व नियोजन करावे लागते. यामध्ये संशोधन प्रक्रियेचे तपशीलवार स्पष्टीकरण उपेक्षित आहे. संशोधनाच्या हेतूमुळे हा आराखडा वेगवेगळा असतो. यामध्ये संशोधनातील समस्येची निवड, माहिती, साधने संशोधनाचे उद्दिष्ट व स्वप्न, त्यामध्ये लागणारे सामाजिक, सांस्कतिक संदर्भ, विषयाची व्याप्ती, नमुना निवड, माहिती संकलनाचे तंत्र इ. गोष्टी असतात.

संशोधनामध्ये ज्या विषयासंबंधात समस्या निवडली असेल त्याचे कारण दिले जाते. या समस्ये संदर्भातील माहिती मिळण्यिासाठी कोणत्या साधनांचा अवलंब करणार याचा उल्लेख करावा लागतो. यासाठी ग्रंथालये, मुळ दस्तऐवज, व्यक्ती इ. या माहिती साधनांची माहिती दयावी लागते. अभ्यास विषयाचे संशोधन करण्याचा हेतू कोणता, याचे स्वरूप कसे असेल याचे स्पष्टीकरण केलेले असते. ज्या व्यक्तीकडून माहिती मिळवावयाची आहे, त्या व्यक्तींची सामाजिक, आर्थिक, सांस्कतीक पार्श्वभूमीची नोंद करावी लागते. नमुना निवडीचा प्रकार व प्रकाराची पद्धती स्पष्ट करावी लागते. नंतरची पायरी म्हणजे माहितीचे संकलन यामध्ये कोणत्या तंत्राने माहिती संकलित करणार आहे त्या तंत्राचे स्पष्टीकरण करणे अपेक्षित आहे. उदा. प्रश्नावली, मुलाखती या सर्व गोष्टी संशोधनाच्या आराखडयात आवश्यक असतात.

**संशोधनाचे हेतू:**

**१. परिचयात्मक संशोधन आराखडा:**

यामध्ये प्रथम समस्येचे निरीक्षण केले जाते. त्यावरून गृहीतकृत्य मांडले जाते. नंतर त्याची चाचणी घेतली जाते. अनुभवजन्य घटना शोधून महत्वाचे बदल सिद्ध केले जातात. माहिती गोळा करण्यासाठी सहभागी लोकांचे निरीक्षण, त्यांच्या सखोल मुलाखती घेतल्या जातात. त्यांच्यामधील सुप्त असलेली वैशिष्ट्ये, त्यांचे परस्पर संबंध पाहिले जातात.

**२. वर्णनात्मक संशोधन आराखडा:**

अभ्यासाच्या विषयासाठी निवडलेल्या सहभागी लोकांची सर्व वैशिष्ट्यांची सविस्तर माहिती घेऊन त्यांचे वर्णन केलेले असते. यासाठी त्यांच्या सखोल मुलाखती त्यांचे निरिक्षण ही तंत्रे वापरणे आवश्यक असते. तसेच समस्येची ऐतिहासिक पार्श्वभूमीही विचारात घ्यावी लागते. या पार्श्वभूमीचे वर्णन करणे व तिची माहिती मिळवणे ही या आरेखनाची महत्वाची गोष्ट असते. म्हणून ज्या क्षेत्राविषयी माहितीची ओळखच झालेली नाही, असे क्षेत्र संशोधनासाठी निवडले जाते.

**३. निदानात्मक संशोधन आराखडा:**

यामध्ये समस्या अनुभवजन्य घटनांतून निवडलेल्या, घटना, त्यांची वैशिष्ट्ये याविषयी भावी काळातील कथन हा आराखडयाचा मुख्य हेतू असतो. सर्वेक्षण, प्रश्नावली व आशय विश्लेषण ही तंत्रे यात असतात. विषयाचे विश्लेषण

करून उपाय योजना सुचविणे हे कार्य या आराखडयामार्फत केले जाते. ज्या क्षेत्रातील विस्तृत माहिती मिळाली आहे त्या क्षेत्रातील समकालीन समस्यांचा विचारही या आरेखनात केलेला असतो.

**४. प्रायोगिक संशोधन आराखडा:**

यामध्ये अभ्यासाच्या विषयावर पूर्ण नियंत्रण असते सामाजिक शास्त्राच्या संशोधनातही या प्रकारचे संशोधन होत आहे. निरीक्षण व विश्लेषण करून जो घटनांचा अभ्यास केला जातो त्याला प्रायोगिक संशोधन आराखडा म्हणतात. अनुभवजन्य घटनेमागील कारणांची मीमांसा यात केली जाते.

**ग्रंथालय व माहितीशास्त्र यातील संशोधन पदधती:**

संशोधन हे कोणत्याही क्षेत्रातील असले तरी ते विकासाचे साधन आहे. संशोधनामुळे समस्येवरील उपाय सुचतात. म्हणजे संशोधनातून आणखी नवीन समस्या निर्माण होतात. त्यामुळे अभ्यास विषय, नवीन संशोधन अशी क्रिया चालू राहते. अर्थात याला शास्त्रीय बैठक आवश्यक असते.

ग्रंथपालन व्यवसायातील संशोधनात ग्रंथापालन व्यवस्थापनाच्या समस्या, त्यांची मुलभूत माहिती, त्या माहितीचे संघटन आणि माहितीचे विश्लेषण इ. गोष्टी अंतर्भूत होतात. या सबंधित समस्यांचा अभ्यास, सर्वेक्षण करून संशोधन करता येते. ग्रंथपालन व्यवसायात आधुनिक काळात होणारी ज्ञानशाखांची वाढ, त्या विषयांची समज, त्यामुळे नव्याने येणारे तंत्रज्ञान या गोष्टी नव्याने रूजू होत आहेत. या गोष्टी योग्य त–हेने होण्यासाठी अर्थातच प्रशिक्षणाची आवश्यक्ता आहे. म्हणून ग्रंथालयांच्या प्रकारानुसार ग्रंथपालन व्यवसायही बदलू लागला. ग्रंथालयांच्या व्यवस्थापनातही बदल होणे अपरिहार्य झाले. या व्यवसायात मुलभूत संशोधनही करता येते. या व्यवसायासंबंधींच्या चिकित्सक दृष्टिकोनावरही संशोधन होऊ शकते. या दृष्टिकोनामुळे व्यावसायिक ज्ञान वाढते हे खरे. या प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमात काही गोष्टी गृहीत धरलेल्या असतात. उदा. व्यवसायिक तंत्रे, त्यांच्या काही प्रकिया इ. या सर्व गोष्टींचा चिकित्सक तपास अभ्यास व्हायला हवा. हा अभ्यास कोणतेही पूर्वग्रह न धरता करावयाला हवा. यामुळे कर्मचारी वर्गाचे कौशल्य वाढण्यास मदत होते. त्यांच्या कामाचा विकास होतो. या व्यवसायात सर्वेक्षण पदधतीही वापरता येते.

ग्रंथालय व माहितीशास्त्र हे आंतरशाखीय आहे. यामध्ये अनेक व्यवसाय संबंधित आहेत. यामध्ये सिद्धांताची माहिती आणि सेवांची सुधारणा यामध्ये समतोल साधला जातो. या व्यवसायातील माहिती सेवांमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न करते. यासाठी इतर ज्ञानशाखांची तंत्रे आत्मसात करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामार्फत संकल्पना स्पष्ट केल्या जातात. समस्यांची उकल करण्यासाठी तंत्राचा वापर होतो. त्यामुळे या व्यवसायाला संशोधनाचे महत्व पटलेले आहे.

**समारोप:**

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात संशोधनाला इतर क्षेत्राइतकेच महत्व आहे. संशोधन हे अविरत चालू राहणारी क्रिया आहे. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात नवीन प्रकल्प, सिदधांत येण्यासाठी संशोधन करत राहणे गरजेचे आहे.

**संदर्भ:**


१. संत, दु. का.(२००४): शोध विज्ञान कोश पुणे; पुणे विदयार्थी गृह प्रकाशन
२. कोण्णूर, एम. बी. आणि इतर.(२००८): डायमंड ग्रंथालय व माहितीशास्त्रकोश; डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
३. रिसवडकर, म. रा. (२०००): संशोधन: व्याख्या आणि पदधती, नाशिक; यशवंतराव चव्हाण महाराष्ट मुक्त विदयापीठ.
४. Inamdar, S. A. N. (2014): Festschrift in honor of Dr. N. I. Divatankar Parameters and perspectives of LIS education ABS Publication- Varanasi.



प्रा. शिंगाडे डी. आय.
ग्रंथपाल, राधाबाई काळे महिला महाविदयालय, अहमदनगर–४१४००१.
आणि
प्रा. चक्के, एम. आर.
ग्रंथपाल, न्यु आर्ट, कॉमर्स अॅन्ड सायन्स कॉलेज, शेवगांव–४१४५०२.